पोलीस अधीक्षक, सातारा
सहा. पोलीस निरीक्षक,म्हसवड पोलीस ठाणे
फोन नंबर ०२३७३-२७०२३३
ईमेल – mhaswadps.satara@mahapolice.gov.in

दिनांक १७/०९/२०२६

# " विहीरीतील मोटारी चोर ताब्यात तीन मोटारी हस्तगत"

म्हसवड पोलीस ठाणे हद्दीतील शेतातील विहीरीतील मोटारी चोरीला गेलेबाबत रविंद्र जालिंद कुंभार, रा. कुकूडवाड ता. माण जि. सातारा यांचे चाहुर नावाचे शिवरातील सार्वजनिक विहीरीतुन सम्राट कंपनीची पाणबुडी मोटार ही चोरीला गेली होती. सदरची मोटार चोरी प्रकरणी त्यांनी पोलीस ठाण्यात येवुन अज्ञात चोरट्या विरुध्द तक्रार दिली होती. सदर तक्रारीचे अनुषंगाने म्हसवड पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. २६०/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यांतील अज्ञात आरोपीचा शोध घेतला असता आरोपी हे गुन्हा घडलेपासुन नजरेआड होता. सदर गुन्ह्यांतील आरोपीचा शोध घेण्यासाठी मा. श्री. निखील पिंगळे, पोलीस अधीक्षक, सो,सातारा, मा. श्रीमती वैशाली कडुकर, अपर पोलीस अधीक्षक सो, सातारा, मा. श्री. रणजित सावंत, उपविभागीय पोलीस अधीकारी सो, दहिवडी उप विभाग, यांनी सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे वरिष्ठांनी केलेल्या मार्गदर्शनावरुन म्हसवड पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी श्री. संदीप पोमण, सहाय्यक पोलीस निरीक्षक, व पोलीस उपनिरीक्षक, अमित शिंदे व अंमलदार यांनी सदर गुन्ह्यांतील आरोपीचा गोपनिय बातमीदारामार्फत व तांत्रिक माहीतीच्या आधारे शोध घेवून आपल्या कौशल्याचा परिपुर्ण वापर करुन १) अखिल विलास जाधव, रा. मानेवाडी कूकुडवाड ता. माण जि. सातारा, २) अदित्य तानाजी पुकळे, रा. पुकळेवाडी ता. माण जि. सातारा व ३) वैष्णव विकास कोळी रा. पुर्नवसन कॉलनी मायणी ता. खटाव जि. सातारा ताब्यात घेवून त्यांचेकडे सखोल तपास करुन त्यास अटक करण्यात आली आहे. आरोपी यांचेकडे गुन्ह्यांचे अनुषंगाने तपास करण्यात आला आरोपी यांनी प्रथम उडवाउडवची उत्तरे दिली, पोलीसांनी आरोपीना खाक्या दाखवताच आरोपीनी मोटार चोरी केल्याची कबुली देवुन चोरीस गेलेली पाणबुडी मोटार व त्या सोबत चोरी केलेल्या अन्य दोन मोटारी काढुन दिल्या आहेत. सदर गुन्ह्यांचा तपास सुरु आहे.

सदर गुन्ह्यांचे तपासात इतर दोन गुन्हे उघड झालेले [illegible]. असुन आरोपी यांचेकडुन १,४८,०००/- रुपये रक्कमेचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. निखील पिंगळे, पोलीस अधीक्षक, सो,सातारा, मा. श्रीमती वैशाली कडुकर, अपर पोलीस अधीक्षक सो, सातारा, मा. श्री. रणजित सावंत, उपविभागीय पोलीस अधीकारी सो, दहिवडी उप विभाग,दहिवडी यांचे मार्गदर्शनाखाली म्हसवड पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक, श्री. संदीप पोमण, अमित शिंदे, पोलीस उपनिरीक्षक, व अमंलदार देवानंद खाडे, सुरेश हांगे, नवनाथ शिरकुळे, अनिल वाघमोडे, सतिष जाधव, संतोष काळे यांनी केली असुन कारवाईमध्ये सहभागी अधिकारी व अमंलदार यांचे पोलीस अधीक्षक, सातारा तसेच अपर पोलीस अधीक्षक, सातारा यांनी अभिनंद केले.

(पोलीस अधीक्षक यांचे मान्यतेने)

प्रति,
सर्व संपादक....

Scanned with OKEN Scanner